साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
वर्ष 31 वे
| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख
संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०
| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com
नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१२४ | पाने-१२ | दि.५/५/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.


॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
शिवम
स्टिल ॲन्ड सिमेंट एजन्सी
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे
(9850125561, 9423339966)
खडी, क्रॅशसॅण्ड योग्य दरात मिळेल
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

# ऊस बिलाचा प्रश्न पेटला - नोव्हेंबर २०२२ पासूनचे पैसे थकीत
## आठ दिवसात पैसे न मिळाल्यास कारखानदारांना रोखणार

करमाळा : करमाळा तालुक्यातील साखर कारखान्यांनी ऊसाची बिले नोव्हेंबर २०२२ पासून थकवली आहेत. वारंवार मागणी करूनही कारखानदार शेतकऱ्यांची बिले देत नसल्याने शेतकरी संतप्त झाले असून येत्या आठ दिवसात ऊसाची बिले मिळाली नाहीतर शेतकरी संघटीतरित्या कारखानदारांना भेटतील तेथे रोखणार आहेत. असे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले आहे.

करमाळा तालुक्यातील मकाई सहकारी साखर कारखाना, कमलाई शुगर्स, भैरवनाथ शुगर्स या तीनही कारखान्यांनी ऊसाची बिले थकवलेली आहेत. कारखाना सुरु झाल्यानंतर पहिले दोन मस्टरची बिले वितरीत केली आहेत. त्यानंतरची बिले मात्र रखडलेली आहेत. काही कारखान्याची बिले जानेवारी जमा आहेत तर काही कारखान्याची डिसेंबर पर्यंत जमा आहेत. तर काही शेतकऱ्यांची नोव्हेंबर पासूनची बिले रखडलेली आहेत. शेतकरी वारंवार कारखान्यावर जाऊन बिलांची मागणी करत आहे. परंतु कारखानदार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांनी कोणत्याही संघटनेशिवाय एकत्र येऊन या कारखानदाराविरूध्द आंदोलन करण्याचे ठरविले आहे.

त्यानूसार येत्या आठ दिवसात शेतकऱ्याची बिले मिळाली नाहीतर शेतकरी संघटीत होऊन साखर कारखान्याचे चेअरमन, एमडी तसेच कारखान्याचे मालक यांना घेरणार आहेत. एकदा सापडल्यानंतर संबंधितांना बिल मिळेपर्यंत सोडणार नाही; असा इशारा ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी दिला आहे.



कारखान्याचे पैसे न मिळाल्याने शेतकऱ्यांना खाजगी सावकाराचे कर्ज घ्यावे लागत आहे. पैसे अभावी कुटूंबातील लग्न पुढे ढकलावी लागली आहेत. पुढील पिकासाठी खते, औषधे घेणे दुरापास्त झाले आहेत. एवढेच नाहीतर परिवारातील कपड्या पासून खाणे-पिण्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा स्थितीत कारखानदारांनी शेतकऱ्यांचे पैसे आडविणे हा शेतकऱ्यांवर मोठा अन्याय आहे.

॥ सस्नेह निमंत्रण ॥
॥ श्री गणेशाय नम: ॥
चि.गणेश
कै.अनंतराव(आबा) कोंडिबा सावंत यांचे नातू व सौ.मीना-श्री.दादासाहेब अनंतराव सावंत रा.करमाळा यांचे द्वितीय सुपुत्र
चि.सौ.कां.शिवानी
कै.स्वातंत्र्य सेनानी शंकर ज्योतिबा वाळके यांची नात व सौ.जयश्री-श्री.नानासाहेब शंकर वाळके रा.ठोंबळ सांगवी ता.आष्टी, ह.मु.सुरत(गुजरात) यांची सुकन्या
यांचा शुभविवाह
रविवार दि.७/५/२०२३ रोजी सायं. ७ वा. १८ मि.
या शुभमुहूर्तावर करण्याचे योजिले आहे. तरी वर-वधूस शुभाशिर्वाद देण्यासाठी सहकुटूंब सहपरिवार उपस्थित रहावे, ही नम्र विनंती !
• विवाहस्थळ •
सावंत फार्म हाऊस
एकदंत मंगल कार्यालय शेजारी
जामखेड रोड, बायपास चौक
करमाळा.
आशिर्वाद
टीप : सर्वांना निमंत्रण पत्रिका पाठविलेल्या आहेतच.नजरचुकीने कोणास निमंत्रण पत्रिका मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून शुभकार्यास अगत्य येण्याचे करावे, ही नम्र विनंती !
आपले नम्र : ● समस्त सावंत व वाळके परिवार, करमाळा.

निसर्ग लहरी असतो, त्यामुळे मानूष्याने कायम सतर्क राहीलेतरच निभाव लागतो..!!!

**संपादकीय............................................!**

# निसर्ग बदलला, तुम्ही..?

अलीकडे निसर्गाचे चक्र बदलल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. पूर्वी मे महिन्यात अखेरीस अवकाळी पाऊस येत असे, पण यावर्षी मार्च-एप्रिल मध्ये पाऊस झाले. मध्येच वारे, वादळ, गारा आणि पाऊस असे सतत निसर्गाचे आघात सुरू आहेत. कधी घरावरचे पत्रे उडून जात तर कधी छप्पर उडून जात. कधी पोपई, केळी, आंब्याची झाडे उन्मळून पडत तर कधी वीजेचे मोठमोठे खांब कोसळून पडल्याचे चित्र दिसून येत आहे. शेतकऱ्यांना यावर्षी वादळी वारे आणि पाऊस यांनी प्रगतीपासून रोखले आहे. द्राक्ष उत्पादकापासून ते केळी-डाळींब उत्पादकांना या निसर्गाचा मोठा फटका बसला आहे. उमरड येथील शेतकरी रविंद्र गोडगे यांच्या शेतातील १८ एकर केळी प्लॉट वादळात भुईसपाट झाल्याचे समजले. वर्षभर लहान लेकरासारखे पीकाला सांभाळायचे. वेळच्यावेळी पाणी, खत, औषधे यावर लाखो रूपये खर्च करायचे आणि ऐनभरात आलेले पीक वादळात भुईसपाट झाले तर त्या शेतकऱ्यांनी काय करायचे ? हा खरा प्रश्न आहे.

कधी वादळ, कधी पाऊस तर कधी दुष्काळ, पाणी टंचाई. पाणी असले तर वीज टंचाई, दोन्ही असलेच तर संकरीत बियाणे टंचाई. ते सर्व मिळालेतर खत टंचाई. हे ही सर्व मिळाले तर मजूर टंचाई, एवढे सर्व मिळाले व अन्न धान्य अथवा फळे, भाजीपाला तयार झाला तर ग्राहक टंचाई. मालाला उठाव नाही, माल विकूनही प्रवासाला दुसऱ्याकडून पैसे उसणे घेण्याची वेळ. थोडक्यात मला येथे एक कथा आठवते. पुर्वी एका राज्याची एकुलती एक राजकन्या खूप लाडकी होती. तिला गोष्टी खुप आवडत असे. तीने मला रोज न संपणारी गोष्ट पाहिजे असा राजाकडे हट्ट धरला. मग राजाने दवंडी पिटली. जो राजकन्येला तीचे लग्न होवून सासरी नांदायला जात नाही तो पर्यंत कथा संपणार नाही; अशी कथा सांगेल त्याला दरमहा १० हजार रूपये पगार मिळेल. अनेकजण कथेसाठी आले, पण त्यांच्या कथा चार-आठ दिवसाच्या पुढे गेली नाही. त्यानंतर एकजण राजाकडे आला व म्हणाला, 'मी राजकन्येला न संपणारी गोष्ट सांगतो.' राजाने परवानगी दिली. मग त्या व्यक्तीने राजकन्येला गोष्ट सांगायला सुरवात केली. एक भातपूर होते. तिथे हजारो पातल्यात भात शिजवला जात असे. येथे प्रचंड प्रमाणात भात शिजवला जात असल्यामुळे या गावाचे नाव भातपूर असे ठेवले आहे. त्या गावाच्या शेजारी चिमणापूर होते. तिथे लाखो चिमण्या होत्या. पण त्यांना खायला काहीच नव्हते. एक दिवस एक चिमणी अन्न शोधत शोधत भातपूरला आली. तीने एका पातेल्यातील झाकण उघडे पाहिले व त्यातील तांदळाच्या भाताचे दाणे चोचीत घेऊन खाल्ले व जमेल तेवढे पुन्हा चोचीत घेऊन चिमणापूरला गेली. तिला एका चिमणीने विचारले 'इथे पाहायला दाणा नाही, तु एवढे भाताचे दाणे कोठून आणले?' त्यावर तीने सर्व खरी हकीकत सांगितली. मग ती चिमणी भातपूरला आली, तिने भाताचे दाणे नेले, तीने दुसरीला हकीकत सांगितले, दुसरीही आली भाताचे दाणे घेऊन गेली, मग तिसरी आली तीने भाताचे दाणे नेले. मग चौथी आली, तीने भाताचे दाणे नेले. असे असे सांगत सांगत कथाकाराने शंभरावी चिमणी आली व तिने भाताचे दाणे नेले. त्यावर राजकन्या म्हणाली, 'हे चिमणीचे दाणा पुराण कधी संपेल व कथा पुढे कधी जाईल.' त्यावर तो म्हणाला, 'भातपूरच्या पातेल्यातील जो पर्यंत भात संपत नाही तो पर्यंत चिमण्या जात राहतील, त्यांची संख्या वाढत जाईल. यात कदाचित तुमचे लग्न होईल व तुम्ही नांदायला जाल पण ही कथा संपणार नाही.' त्यानंतर राजकन्येने त्याला कथा थांबवयास सांगून, राजाला मला कथा ऐकायची नाही; हे सांगितले.

या कथेतील चिमण्या भातपूरला जाण्याचे जशा थांबणार नाहीत, तशीच ती कथा पण न संपणारीच राहणार आहे. त्याच प्रमाणे शेतकऱ्याच्या व्यथासुध्दा न संपणाऱ्या कथेसारख्या आहेत. या व्यथा कोण सोडवणार..? सरकार की नातेवाईक, मित्र की आणखी कोण..? याचे उत्तर माऊली ज्ञानोबारायाने दिले आहे. ते म्हणतात. 'आपुली आपण करा सोडवण। संसारबंधन तोडी वेगे॥२॥' या सर्वबाबीतून आपणालाच सुटका करावी लागणार आहे. पीक पध्दतीत बदल करावा लागणार आहे. ज्याप्रकारे दुष्काळावर शेततळी हा काही प्रमाणात यशस्वी ठरलेला प्रयोग आहे. पाणी बचतीसाठी ठिबक सिंचन हा ही पर्याय चांगला आहे. निसर्गाचा तडाखा पीकाला बसू नये म्हणून पॉलीहाऊस हा उत्तम पर्याय ठरलेला आहे. तसेच शेतीतील फळझाडांचे संरक्षणाला एका शेतकऱ्याने सोपा पण चांगला पर्याय केला आहे. त्याने शेतीच्या कडेला जांभूळाची झाडे लावली, त्याच्या आत आवळा झाडे लावली, त्यानंतर आंबा इतर फळाची झाडे लावली. यामुळे किती जोराचे वादळ आलेतरी ते बाहेरच्या झाडावर येत होते आतील झाडे सुरक्षित रहात होती. झाडेच नव्हेतर झाडाच्या फळांनाही धोका पोहचत नव्हता. एका शेतकऱ्याने डोंगराच्या तळाला शेती केली. की ज्यामुळे वादळ वारे डोंगर थोपवत होता, पाणी शेतात येत असे. शेतीतील पीके मात्र सुरक्षीत होती. वीज टंचाईवर बीडच्या एका शेतकऱ्याने प्रयोग केला, तसाच प्रयोग आम्हीही केला आहे. तो प्रयोग म्हणजे उंचीवर शेततळे केले आहे. शेततळ्याच्या तळाला पाईप बसवून तो बाहेर काढला आहे. त्याला कॉक बसवला आहे. वीज जेंव्हा येते तेंव्हा सर्व पाणी शेततळ्यात पडते. रात्री अपरात्री दारे धरणे हा त्रास नाही. शिवाय वीजेचा प्रश्न निर्माण झालातरी कोणतीच काळजी नाही. दिवसा पाहिजे तिथे पाणी सोडायचे, पाऊस अथवा वीज नसलीतरी पीकाला वेळेवर व ठिककला पुर्ण दाबने पाणी मिळते. खते व बियाणे यासाठी स्वावलंबी बनले पाहिजे. घरी किमाण चार-पाच जणावरे असलीतरी शेणखत मिळते, जिवामृत मिळते, स्लरी मिळते. पारंपारीक बियाणे सांभाळणे व त्यातून उत्पादन केलेतर या उत्पादनाला चांगला भाव मिळतो. आता शेती व सोने याचे दर प्रचंड वाढले व वाढत आहेत. त्यामुळे जर शेती करता नाही आली तरी ती सांभाळता आली पाहिजे, हे विसरून चालणार नाही. शेतकऱ्यांने एक गोष्ट पक्की लक्षात ठेवली पाहिजे की आपल्याकडे काय पिकते यापेक्षा बाजारात काय विकते हे पाहून पीक नियोजन केले पाहिजे. विशेषत: स्थानिक बाजारात आपणाला कधीच भाव मिळणार नाही. त्यामुळे पीक उत्पादन हे निर्यातक्षम असले पाहिजे. ते पुणा, मुंबई, दिल्ली येथे पाठवता आले पाहिजे व विकता आले पाहिजे. पोथरे येथील महादेव शिंदे हे काळी तजेलदार वांगी उत्पादीत करतात पण करमाळा मंडईला कधीच विकत नाही.ते ती वांगी मुंबईला स्व:ताच्या पीकअप मधून नेतात व विकतात. त्यामुळे त्यांची कोठेच फसवणूक होत नाही व उत्पादनही चांगले मिळते.

शेटफळ येथील विजय लबडे व नानासाहेब साळुंके हे पेरू उत्पादन करतात, त्यांचे पेरू दिल्ली मार्केटला पाठवतात. वाशिंबेचे अभियंता अभिजित पाटील हे लाल व वेलची केळी उत्पादन करतात व सर्वापेक्षा जास्त भाव मिळवतात.पिंपळवाडीचा युवक शेतकरी मारूती खोमणे हा दरवर्षी कांदा करतो, भाव असो नाहीतर नसो. भाव नसेल तर कांदा साठा करून ठेवतो व भाव आला की विकतो. तो म्हणतो, की वर्षात किमान एकदातरी कांद्याला चांगला भाव येतोच. असे अनेक शेतकरी आहेत की , जे वेगवेगळ्या प्रकारचे प्रयोग करून शेतीतून लाखो रूपयाचे उत्पादन मिळवतात. नकारात्मक शेती करणाऱ्यापेक्षा होकारात्मक शेती करणारे जे आहेत त्यांच्याकडे पाहिले पाहिजे.

देश हा कृषीप्रधान आहे. आपले सर्वांचेच शेतीवर अवलंबून आहे. शेती पिकलीतरच देशातील लोक अन्नधान्य खाणार आहेत. अन्नधान्याला पर्याय नाही, हे कोरोणाने जगाला दाखवून दिले आहे. त्यामुळे निराश न होता, निसर्गाला शह देण्यासाठी वेगळे प्रयत्न करण्याची गरज आहे व तसे प्रयत्न केले पाहिजे. थोडक्यात निसर्ग बदलला आपण बदलेले पाहिजे, हे विसरून चालणार नाही.

## बुध्दीवंत परीक्षेत क.न.प. मुलींची शाळा नं.२ चे यश





करमाळा(सं.प्र.): करमाळा नगरपरिषद मुलींची शाळा नं.२ मधील इयत्ता पहिलीतील तीन विद्यार्थ्यांनी बुध्दीवंत परीक्षेत उत्तुंग यश संपादन केले आहे. या परीक्षेत अर्पिता आनंद नाईकनवरे हिने १५० पैकी ११८ गुण मिळवत केंद्रात सहावा क्रमांक मिळविला तर ओवी अभिजीत पिसे व कशफ समीर सय्यद यांनी११० गुण मिळवत केंद्रात आठवा क्रमांक मिळविला आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका प्रज्ञा जोशी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षिका यांचे अभिनंदन मुख्याधिकारी बालाजी लोंढे, प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, केंद्र समन्वयक दयानंद चौधरी, लिपीक शिवदास कोकाटे, मुख्याध्यापक बलभिम शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष असिफ जमादार यांनी अभिनंदन केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत म.गांधी विद्यालयाचे घवघवीत यश

करमाळा(सं.प्र.) : शिष्यवृत्ती परीक्षेत करमाळा येथील महात्मा गांधी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तालुक्यामध्ये सर्वात जास्त निकाल लावून घवघवीत यश संपादन केले आहे. इ.५ वीचे विद्यालयातील एकूण ८७ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षा दिली. यामध्ये ३५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. यात विराज अजित कणसे (७२%), प्रणित नारायण राजगुरू (७०%), कार्तिकी हौसराव काळे (६९.३३%), रणवीर सचिन चेंडगे (६५.५३%), सोहम अंकुश दळवी (६४%) यांनी घवघवीत यश संपादन केले. इ.८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ५३ विद्यार्थी बसले होते. त्यामधील १८ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. यात सार्थक उत्कर्ष गांधी (७८%), शरवी शिवराज चिवटे (६६.६६%), हर्ष उमेश माहुले (६४%), ओम विजय गुगळे (६०.६६%), तेजस विक्रम राऊत (५६%) यांनी सुयश संपादन केले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार जयवंतराव जगताप, माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन शंभुराजे जगताप, मुख्याध्यापक पोपट कापले, पर्यवेक्षक एस.टी.शिंदे, बी.के.पाटील यांनी केले.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# सामाजिक कार्यात खाटेर परिवार आघाडीवर - शंभुराजे जगताप



करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुक्यात सामाजिक कार्य करण्यात श्रेणिकशेठ खाटेर व त्यांचा परिवार हा आघाडीवर असून वेगवेगळ्या क्षेत्रात ते सामाजिक कार्य करतात. हे काम असेच वेगवान पध्दतीने घडावे; असे आवाहन जगताप गटाचे युवा नेते व खरेदी-विक्री संघाचे चेअरमन शंभुराजे जगताप यांनी केले.

श्रेणिकशेठ खाटेर व नगरसेविका संगीता खाटेर यांनी करमाळा शहरातील भाविकांना मोफत शिखरशिंगणापूर व गोंदवले तीर्थक्षेत्रावर तीर्थयात्रा सुरु केली आहे. त्याची पहिली फेरी आज (ता.५) बुध्द पौर्णिमेच्या निमित्ताने निघाली असताना शुभेच्छा देताना श्री.जगताप बोलत होते. यावेळी नाभिक संघटनेचे अध्यक्ष नारायण पवार, पत्रकार संजय शिंदे, बँक अधिकारी शंकर रासकर, श्री.अनारसे, श्री.वाघमोडे, व्यापारी नितीन दोशी, परदेशी महाराज, संतोष गानबोटे, विठ्ठलराव भणगे यांचेसह नगरसेविका संगीता खाटेर, सौ.लुंकड, सौ.शिंदे, सौ.मंडलेचा, माजी नगरसेविका मंदाताई पवार, सौ.महाजन, सौ.शिगची महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या. प्रास्ताविक श्रेणिकशेठ खाटेर यांनी केले आभार वर्धमान खाटेर यांनी मानले.

श्रेणिकशेठ खाटेर यांना सामाजिक कार्याची मोठी आवड आहे. सुरुवातीला त्यांनी दारू मुक्तीसाठी अनेकांना शेषेराव महाराज यांचेकडे बुलढाण्याला नेले होते. त्यानंतर त्यांनी भागवत कथा, रामायण कथा अशा वेगवेगळ्या संतांच्या कथा आयोजित केल्या. करोडो रुपयाची मिळकत गोरक्षण संस्थेला देऊन गुरुगणेश दिव्यरत्न गोशाळा सुरू केली आहे. याबरोबर समाजातील अनेक घटकांना मदत करण्याचे काम ते करतात. आता श्री क्षेत्र गोंदवले महाराज येथे दर पौर्णिमेला मोफत भक्तांना घेऊन जाण्याचे काम त्यांनी सुरु केले आहे. हजारो व्यक्तींची नेत्र तपासणी करून मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया त्यांच्या माध्यमातून झालेल्या आहेत. या त्यांच्या कार्याला मनापासून शुभेच्छा! ...ॲड.डॉ.बाबूराव हिरडे

## पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत

# केत्तूर नं.२ येथील दत्तकला आयडियल स्कुलचे सात विद्यार्थी पात्र

करमाळा(सं.प्र.): फेब्रुवारी २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत दत्तकला आयडियल स्कुल केत्तूर नं.२ प्रशालेतील सात विद्यार्थी पात्र ठरले असून यशस्वी विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत अर्णव अंबादास मिंड (२३४), ऋतुजा रविंद्र राऊत (१७४), सुमित प्रकाश जाधव (१६०), प्रेमराज प्रशांत सरवदे (१५४), कार्तिक लक्ष्मण गुटाळ (१३४), स्मित दादासाहेब देवकर (१२०) यांनी तर माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत राज पांडूरंग खाटमोडे (१९४) याने यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, उपाध्यक्ष राणा सुर्यवंशी, सचिवा प्रा.माया झोळ, स्कुल डायरेक्टर प्रा.नंदा ताटे, प्राचार्य विजय मारकड यांनी केले.

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

ओजस हॉस्पिटल
OJS HOSPITAL
AlIOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
✻ वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ ✻
✻ २४ तास अत्यावश्यक सेवा ✻
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार M.sc. Biotech, Health & Nutritionआहारतज्ञ
ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार • हृदयरोग व उच्च रक्तदाब • मधुमेह • थायरॉईड • संधिवात • पोटाचे आजार • स्त्रियांचे आजार • श्वसनसंस्थेचे आजार • मणक्यांचे व हाडांचे विकार • मुतखडा • मुळव्याध • सौंदर्य समस्या • त्वचारोग व केशविकार • आहारविषयक मार्गदर्शन..
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा) Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत) PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test (गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. • संपर्क : मो.9960334005, 9423333950

## रहिमतपूर येथील गुणगौरव सोहळ्यात

# गुरूकुल पब्लिक स्कुलच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार



करमाळा (सं.प्र.) : रहिमतपूर येथे झालेल्या गुणगौरव सोहळा कार्यक्रमात करमाळा येथील गुरूकुल पब्लिक स्कुल मधील स्पर्धा परीक्षेत सुयश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सिक्कीम राज्याचे माजी राज्यपाल व सातारा जिल्ह्याचे खासदार नितीन बानगुडे-पाटील, म.राज्य शिक्षण संचनालयचे उपसंचालक राजेश क्षीरसागर, महाराष्ट्र शासन राज्यकर उपायुक्त अंजली ढमाळ, सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त विद्या पोळ-जगताप, आय.आर.बी.कंपनी मुंबईचे मुख्य जनसंपर्क अधिकारी जयंत डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते. या गुणगौरव सोहळ्यात स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त केलेले गुरुकुल पब्लिक स्कुलचे प्रतिक होनकळसे, आदित्य भांगे, समर्थ शेळके, तरेश थोरात, स्पंदन सावंत, पंशुल सरडे, आदिती चेंडगे, अमरनाथ चिवटे, शुभनित साळुंखे, शार्दुल कुलकर्णी, शर्वरी सपकाळ, सार्थक सुर्यवंशी, अथर्व राठोड यांचा सत्कार करण्यात आला. तसेच अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक नितीन भोगे व सचिवा रेश्मा भोगे यांनी सत्कार करून त्यांचेवर कौतुकाचा वर्षाव केला.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना श्रीजय नेत्र रूग्णालय
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A
करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# शिष्यवृत्ती परीक्षेत पाडळी जि.प.शाळेचे यश



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांचे वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाडळी या शाळेतील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले आहे. या परीक्षेत शाळेतील संभव काकासाहेब पवार यास ३०० पैकी २४६ गुण मिळाले आहेत. संभव पवार व सानिका अनिल वायकर हे शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका मीराबाई चंद्रकांत जाधवर यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्र दिनी शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षिका यांचा पाडळी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य तसेच पोलीस पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कोणताही क्लास न लावता वर्गशिक्षिकांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास करून शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षिका यांचे अभिनंदन गटविकास अधिकारी मनोज राऊत, गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील यांनी केले.

# राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत देवी विद्यालयाचे सुयश


कु.समृध्दी विक्रम साळवे


कु.सुप्रिया भागवत बरडे


कु.सानवी सुरेश अडसुळ


कु.समृध्दी संतोष अडसुळ

करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र शासना तर्फे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत (NMMS) समृध्दी विक्रम साळवे तर सारथी शिष्यवृत्तीस सुप्रिया भागवत साळवे, समृध्दी संतोष अडसुळ, सानवी सुरेश अडसुळ या पात्र झाल्या आहेत. त्यांच्या यशाबद्दल प्रशालेचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी, सचिव अमोद संचेती, सुनिता देवी, विजयकुमार दोशी, चंद्रकांत देवी तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक एस.एम.जगताप, सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक एस.एन.जगताप यांचे अभिनंदन केले. शाळेच्या यशाबद्दल सर्व पालकस्तरातून कौतूक होत आहे.

# नवभारत इंग्लीश स्कुलमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

करमाळा (सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मेडियम स्कुल व ट्रिंकलींग स्टार्स मध्ये ६३ वा महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रशालेचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी, सुनिता देवी उपस्थित होते. सर्वप्रथम संचालक विजयकुमार दोशी यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीताद्वारे ध्वजाला सलामी देण्यात आली. याप्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते ऑलंपियाड परीक्षेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये यशस्वी ठरलेली पौर्णिमा जयवंत चौरे व केदार महेश अभंग यांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास मुख्याध्यापिका सुनिता मोहिते व शिक्षक उपस्थित होते.

तोच विश्वास, तीच सेवा
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385
Anand Dryfruit
आनंद ड्रायफ्रुटस् & गरम मसाला
• खास उन्हाळ्याकरीता...
थंडाई बोटल, ताक मसाला, कोकम सरबत, आवळा कँडी, वाळा सरबत, रसना, सब्जा बी, वाळा जुडी, रोझ सिरप, आईस्क्रिम पावडर, खडीसाखर, प्रदाळयुक्त गुलकंद, पापड आटा पापड मसाला, पापड खार, मोहरी डाळ, मेथी, लोणचे मसाले...
उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट
केक भांडी, चॉकलेट क्रंची, टर्निंग टेबल नोजल रशियन आईस्क्रिमचे सर्व साहित्य तसेच केक व वाढदिवस डेकोरेशन सजावट साहित्य मिळेल !
एकवेळ अवश्य भेट द्या..!

एच.यु.गुगळे कापड दुकान समोर, मेनरोड, करमाळा.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

पुणे रोड, त्रिमुर्ती कृशनचा वरचा मजला, करमाळा.
उपलब्ध सुविधा..
मो.9423222266
9604762600
डोळ्याचा दवाखाना
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमेट्री
• जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
• नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार • लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

## स्व.सुभाष(आण्णा) सावंत यांचा समाजकार्याचा वारसा

# सावंत परिवाराची पुढची पिढी सक्षमपणे चालवते ही बाब कौतुकास्पद : आ.शिंदे



करमाळा(सं.प्र.) : कामगार नेते सुभाष(आण्णा) सावंत यांनी आपले आयुष्य समाजासाठी वेचले. संपूर्ण जीवनात त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार करूनच वाटचाल केली. त्यांच्या कार्याचा वारसा त्यांची पुढची पिढी सक्षमपणे चालवत आहे; ही बाब विशेष महत्वाची आहे; असे मत आमदार संजयमामा शिंदे यांनी व्यक्त केले.

कामगार नेते व हमाल पंचायतचे संस्थापक अध्यक्ष स्व.सुभाष(आण्णा) सावंत यांच्या ७२ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात आ.शिंदे बोलत होते. सुरूवातीला आ.शिंदे यांचे हस्ते स्व.सुभाष सावंत यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव बंडगर, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख महेश चिवटे, सरपंच अभिजीत मुरुमकर, माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे, माजी सरपंच नामदेव शेगडे, ॲड.नवनाथ राखुंडे, डॉ.संजय कोग्रेकर, देवानंद बागल, अरूणकाका जगताप, शशिकांत केकान, प्रभाकर शिंदे, गजानन गावडे, बाबुराव खुळे, आयुब शेख, भीमराव लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. जयंतीनिमित्त गुरूगणेश दिव्यरत्न गोपालन संस्थेतील जनावरांना करमाळा वि.का.सोसायटीचे चेअरमन मनोज गोडसे यांचे हस्ते हिरवा चारा वाटप करण्यात आला. यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य ॲड.राहुल सावंत, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब सावंत, डॉ.हरिदास केवारे, माजी नगरसेवक संजय सावंत, सावंत गटाचे नेते सुनील सावंत, सुजित बागल, सरपंच भोजराज सुरवसे, दत्तात्रय अडसुळ, विठ्ठल रासकर, वालचंद रोडके, फारूक जमादार, मनोज राखुंडे, संजय शिंदे, मनसेचे नाना मोरे, संभाजी होनप, ॲड.प्रशांत बागल, आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच उपजिल्हा रूग्णालय येथे वैद्यकिय अधिक्षक डॉ.गुंजकर, डॉ.राहूल कोळेकर, राजू आव्हाड, खलील मुलाणी, देवा लोंढे, संतोष वाघमोडे, गणेश मुरूमकर यांचे हस्ते रूग्णांना फळे वाटप करण्यात आले.

जयंतीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानदेव गोसावी, महादेव कांबळे, राजू कांबळे, अनिल रासकर, संजय गायकवाड, सतीश खंडागळे, सुभाष शेंडगे, मोहम्मद पठाण, विठ्ठल गायकवाड, नागेश उबाळे, पांडूरंग सावंत, मजहर शेख, राजकुमार सुरवसे, बंडू अडसुळ, दादा सुरवसे, शरद वाडेकर, सागर सामसे, बापू उबाळे, आकाश कुरकुटे आदींनी परिश्रम घेतले.

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी
२०० रूपये भरून वर्षेभर घरपोच अंक मिळवा.

# नवभारत इंग्लीश स्कुलमध्ये कथक नृत्यालयाची स्थापना



करमाळा(सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मेडियम स्कूल व ट्रिंकलींग स्टार्स मध्ये महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून कथकनृत्यालयाची स्थापना करण्यात आली. याकामी डॉ.वैष्णवी पाटील, डॉ.अपर्णा भोसले, रेश्मा जाधव, आरती दिवाण यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशकल्याणीचे गणेश करे-पाटील हे होते. प्रमुख पाहूणे म्हणून प्रशालेच्या सर्वेसर्वा सुनिता देवी, कथक शिक्षिका कांचन पालकर, शिल्पा अंतापुरकर, बाळासाहेब नरारे सर, मुख्याध्यापिका सुनिता मोहिते उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पुजनाने झाली. अध्यक्षीय भाषणात करे-पाटील यांनी मानसिक स्वास्थ्य व्यवस्थित ठेवण्यासाठी व आनंदी राहण्यासाठी नृत्य हे कसे आवश्यक आहे व कथक नृत्य किती महत्वाचे आहे याबद्दल माहिती सांगितली. धनाढ्य राष्ट्र म्हणून अमेरिकेकडे पहावे तर संस्कृती पाहताना भारताकडे पहावे; असेही ते म्हणाले. करमाळा तालुक्याला संस्कृतीक माहेरघर बनवण्याचा प्रयत्न नवभारत इंग्लीश स्कुल मध्ये सुरू झाला आहे. सत्या पासून सुरू झालेली परंपरा सौंदर्याकडे चाललेली आहे. शास्त्रीय संगीतातील अविभाज्य भाग म्हणून कथकनृत्याला मानले जाते आणि तेच कथक नृथ्य आता आपल्या करमाळा शहरामध्ये नवभारत इंग्लीश स्कुलमध्ये आपल्यांना उपलब्ध करून दिले जात आहे; असेही सुनिता देवी यांनी सांगितले. यावेळी कांचन पालकर, शिल्पा अंतापूरकर यांनी सरस्वती वंदना व तराना असे अप्रतिम असे सादरीकरण केले. यावेळी प्रशालेतील सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्ग उपस्थित होते.

# सातोली येथे गुणवंतांचा कौतुक सोहळा संपन्न



करमाळा(सं.प्र.) : सातोली येथील संत ज्ञानेश्वर सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने विविध क्षेत्रात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलामध्ये भरती झालेले अक्षय बंडू भोगे यांचा सत्कार सातोलीचे सरपंच मनोहर कदम यांचे हस्ते झाला. भारतीय नौदलात निवड झालेले रणजित रमेश फरतडे यांचा सत्कार उपसरपंच भास्कर खुपसे यांचे हस्ते करण्यात आला. तसेच भारत फोर्स कंपनीमध्ये उच्च पदावर कार्यरत असलेले ऋषिकेश भाऊसाहेब मैंदड, शालेय शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळविलेला प्रशांत मुटेकर यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष बबनराव साळुंके हे होते. यावेळी वाचनालयाचे सर्व सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सद्गुरू आरोग्य धाम सातोलीचे संस्थापक हरिश्चंद्र साळुंके यांनी केले. उपस्थितांचे आभार सोमनाथ टकले यांनी मानले.


## श्री गजानन अगरबत्ती

● सुगंधी अगरबत्ती ● कापूर
● अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
● विविध कलरची रांगोळी
● सर्व प्रकारचे लोबन,
● सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


# महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रव्यापी संघटनेची निर्मिती आवश्यक : माया जमदाडे




करमाळा(सं.प्र.) : महिलांच्या राष्ट्रव्यापी संघटनेच्या निर्मितीशिवाय समस्यांचे समाधान नाही; असे मत भारत मुक्ती मोर्चा महिला संघाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष माया जमदाडे यांनी व्यक्त केले.

भारत मुक्ती मोर्चा महिला संघाच्या वतीने महाराष्ट्र मध्ये विविध विषयावर प्रबोधन करून जागृती निर्माण करण्यासाठी परिवर्तन यात्रा सुरू आहे. सदर परिवर्तन यात्रा करमाळा येथे आली असता यशकल्याणी सेवाभवन येथे आयोजित कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी प्रज्ञाताई कांबळे, भारत मुक्ती मोर्चा महिला संघाच्या राज्यध्यक्षा संगीता शिंदे, उपाध्यक्षा ज्योती मिसाळ आदी मान्यवरांसह मांजरगावच्या ग्रा.पं.सदस्या काजल खरात, अर्बन बँकेच्या संचालिका वंदना कांबळे व आशाताई क्षीरसागर उपस्थित होते.

पुढे बोलताना जमदाडे म्हणाल्या, की भारतामध्ये महिलांवर मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार होत आहे. त्यांना मुख्य प्रवाहात येण्यापासून रोखले जात आहे. त्यांच्या हक्क अधिकारांवर बंधने आणली जात आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच ओबीसीची जातनिहाय जनगणना न करून त्यांच्यावर अन्याय केला जात आहे. महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारत मुक्ती मोर्चाच्या माध्यमातून राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांच्या नेतृत्वामध्ये राष्ट्रव्यापी जनआंदोलनाची निर्मिती केली जात आहे. महिलांनी आपल्या समस्येचे समाधानासाठी भारत मुक्ती मोर्चाच्या राष्ट्रव्यापी संघटनेमध्ये सामील व्हावे; असेही आवाहन जमदाडे यांनी केले. यावेळी योगेश्वरी माने, सुरेखा ओहोळ, कांताबाई मिसाळ, रेणुका कांबळे, मंगल पाटील, कोमल कांबळे, प्रिया कांबळे, चंद्रकला कांबळे, शोभा सस्ते, रंजना विटकर, अश्विनी माने, रूपाली गोडगे यांच्यास महिला उपस्थित होत्या. सुत्रसंचालन हसीना शेख यांनी केले. आभार नलिनी कांबळे यांनी मानले.


## बागायत शेतजमीन विकणे आहे

चिखलठाण नं.१ येथील ६+३=९ (नऊ एकर)
उजनी धरणाला लागून(स्वतंत्र पाईप लाईन) ऊस बागायत
वर्ग-१ ची जमीन योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
संपर्क : ज्ञानदेव बारकुंड, मो.९४२२००१८१७

इथं सौंदर्य जन्म घेतं.. प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा मो.9172092187

## होलसेल साडी डेपो


सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
साड्यांचा भरपूर स्टॉक व भरपूर व्हरायटीमध्ये उपलब्ध !
घरगुती विक्रीसाठी साड्या होलसेल दरात मिळतील



लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186

## आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
fastrack
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.



मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

शिंदे-कुलकर्णी असोसिएटचा प्रकल्प

# शिंदे आर्केड



24 फ्लॅटचा आधुनिक गृहप्रकल्प



बँक कर्ज उपलब्ध


प्रत्येक फ्लॅट ६७८ चौ.फुट बिल्टअप व ५१३ चौ.फुट कार्पेट एरियाचा

**पहिल्या पाच ग्राहकांसाठी खास सवलत**

आपल्या हक्काचं घर आजच बुक करा आणि या संधीचं सोनं करा !

## सोयी सुविधा

- जेऊर रेल्वे स्टेशन व बस स्टॅन्डपासून ५०० मीटर अंतरावर
- आकर्षक प्रवेशद्वार आणि ५ फुटांची संरक्षक भिंत
- सर्व फ्लॅटसाठी उत्तम क्वालिटी टाईल्सचे कार पार्किंग
- संपूर्ण प्रकल्पाला लॅंडस्केप व गार्डनिंग
- 150mm ची बाह्यभिंत व 100mm ची अंतर्गत भिंत
- विंडोज ३ ट्रॅक (मच्छर प्रतिबंधक जाळी)
- 600 x 600 mm वेट्रिफाईड टाईल्स
- सर्व फ्लॅटला वॉटर प्रुफिंग लाकडी दरवाजे व चौकटी
- 600mm लांब व 25mm जाडीचा ग्रॅनाईट किचन प्लॅटफॉर्म
- किचनसाठी ७ फुट लेवलपर्यंत व टॉयलेटसाठी ४ फुट उंचीपर्यंत डिझायनर वॉल
- प्रत्येक फ्लॅटसाठी दोन टॉयलेट, बाथरूम व युटिलिटी एरिया
- प्रत्येक फ्लॅटला दोन बाल्कनी
- अंतर्गत भींतींना नीरू प्लास्टरचे फिनीशिंग तसेच बाह्य भिंतींना 20mm जाडीचे सॅंडफेस प्लास्टर
- संपूर्ण प्रकल्प आरसीसी फ्रेम स्ट्रक्चर
- मुबलक पाण्याची सोय
- सीसीटीव्ही कॅमेरा
- रेन वॉटर हार्वेस्टिंग
- लहान मुलांसाठी खेळायला जागा
- प्रत्येक फ्लॅटला स्वतंत्र पोस्ट बॉक्स
- कन्सिल्ड इलेक्ट्रिक वायर व प्लंबिंग प्वाइंटस



**संपर्क**

**हॉटेल आशिष शेजारी, एस.टी स्टॅन्ड ते जेऊरवाडी चौक रस्ता**

**जेऊर, ता.करमाळा., जि.सोलापूर**

**मो.नं.9172657560, 7038964702**

email id : shindearcade@gmail.com




# सस्नेह निमंत्रण

| वधू | वर |
| --- | --- |
| चि.सौ.कां.**आकांक्षा** | चि.**कृष्णा** |
| कै.पांडुरंग गोपाळ जोशी(दादा) यांची नात व श्री.अविनाश पांडुरंग जोशी रा.करमाळा यांची ज्येष्ठ सुकन्या | कै.भगवानराव कृष्णाजी कुलकर्णी यांचे नातू व श्री.नंदकुमार भगवानराव कुलकर्णी रा.राजुरी, ता.परांडा यांचे ज्येष्ठ सुपुत्र |

यांचा **शुभविवाह**

**शुक्रवार दि.१२/५/२०२३ रोजी दुपारी १२ वा. २३ मि.**

या शुभमुहूर्तावर करण्याचे योजिले आहे. तरी वधु-वरांस शुभाशिर्वाद देण्यासाठी सहकुटूंब, सहपरिवार उपस्थित रहावे, ही नम्र विनंती !

**• आपले नम्र •**

श्री.अविनाश पांडुरंग जोशी (पत्रकार)

श्री.गिरीश पांडूरंग जोशी, श्री.संजय पांडूरंग जोशी

**समस्त जोशी परिवार**

किल्ला विभाग, करमाळा., जि.सोलापूर

**• विवाहस्थळ •**

**महामुनी मंगल कार्यालय**

**संगोबा रोड, करमाळा. जि.सोलापूर**

**मो.९४२३३२६५८७**

**टीप :** सर्वांना निमंत्रण पत्रिका पाठविलेल्या आहेतच.नजरचुकीने कोणास निमंत्रण पत्रिका मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून शुभकार्यास अगत्य येण्याचे करावे, ही नम्र विनंती !





**गुणवंत विद्यार्थी**



कु.समृध्दी विक्रम साळवे



कु.सुप्रिया भागवत बरडे



कु.सानवी सुरेश अडसुळ



कु.समृध्दी संतोष अडसुळ

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत (NMMS) **कु.समृध्दी विक्रम साळवे** व सारथी शिष्यवृत्तीस **कु.सुप्रिया भागवत बरडे, कु.समृध्दी संतोष बरडे** व **कु.सानवी सुरेश अडसुळ** पात्र ठरल्याबद्दल

# हार्दिक अभिनंदन !

**शुभेच्छुक**

**श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान, करमाळा**

श्री.कन्हैयालाल गिरधरदास देवी (अध्यक्ष), श्री.अमोद दीपचंद संचेती(सचिव)

सौ.सुनिता कन्हैयालाल देवी, श्री.विजयकुमार रमणलाल दोशी, श्री.चंद्रकांत बाळकिसनदास देवी

**श्री गिरधरदास देवी विद्यालय, करमाळा.**

श्री.एस.एम.जगताप(मुख्याध्यापक), सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वृंद

**टीप : इ.५ वी व इ.८ वी सेमी व मराठी माध्यमसाठी प्रवेश सुरू !**


धवलक्रांतीचे प्रणेते
सोलापूर जिल्हा दूध संघाचे माजी संचालक
व धवलक्रांतीचे प्रणेते
मा.श्री.राजेंद्रसिंह राजेभोसले
यांना दि.६ मे रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री भैरवनाथ दूध उत्पादक सह.संस्था
वीट, ता:करमाळा, जि:सोलापूर
व्यंकटेश्वरा मिल्क ॲन्ड मिल्ड प्रॉडक्टस्
श्री कमलादेवी औद्योगिक वसाहत, करमाळा. जि:सोलापूर
श्री.राजेंद्रसिंह राजेभोसले
(मा.संचालक, सोलापूर जि.दूध उ.संघ)


३८ वे
पुण्यस्मरण
ऐसा जन्म लाभावा,
देहाचा चंदन व्हावा
आयुष्य संपले तरी साहेब..
आपला सुगंध दरवळत रहावा !
आमच्या संस्थेचे संस्थापक
देशभक्त नामदेवरावजी जगताप साहेब यांच्या
३८ व्या पुण्यस्मरणदिनानिमित्त त्यांचे पवित्र स्मृतीस..
भावपूर्ण आदरांजली !
अभिवादक
महात्मा गांधी माध्य., उच्च माध्यमिक व तांत्रिक प्रशाला करमाळा.
श्री.पी.ए.कापले (प्राचार्य)
श्री.ए.एच.बागवान (उपप्राचार्य)
श्री.एस.टी.शिंदे (पर्यवेक्षक)
श्री.बी.के.पाटील (पर्यवेक्षक)
श्री.व्ही.एल.पवार (उच्च माध्य.विभागप्रमुख)
सर्व शिक्षक, शिक्षिका व कर्मचारी वृंद

### दामाजी एक्सप्रेस दैनिकाच्या वतीने

# विलासराव घुमरे यांना शिक्षणरत्न पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : येथील विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांनी शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेऊन मंगळवेढा येथून प्रकाशित होणाऱ्या दामाजी एक्सप्रेस या दैनिकाच्या वतीने त्यांचा शिक्षणरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या पुरस्काराचा स्वीकार विलासराव घुमरे यांचे सुपुत्र व विद्या विकास मंडळाचे विश्वस्त, युवा उद्योजक आशुतोष घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, उपप्राचार्य कॅप्टन संभाजी किर्दाक यांनी स्वीकारला. या पुरस्काराचे वितरण सोलापूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री प्रा.लक्ष्मण ढोबळे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर युवा नेते शंभुराजे जगताप, शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे, सुजित बागल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### बुध्दीवंत प्रज्ञाशोध परीक्षेत सा.ना.जगताप मुली नं.१ शाळेच्या

# २४ मुली गुणवत्ता यादीत - कार्तिकी सुरवसे राज्यात प्रथम



करमाळा(सं.प्र.) : करमाळा नगरपरिषदेच्या कै.साधनाबाई नामदेवराव जगताप प्राथमिक मुलींची शाळा नं.१ या शाळेतील तब्बल २४ मुलींनी राज्यस्तरीय बुध्दीवंत प्रज्ञाशोध परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवून स्पर्धा परीक्षेतील उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत इ.३ री मधील कार्तिकी सुरवसे हिने ३०० पैकी २८८ गुण मिळवून राज्यात प्रथम तर इ.१ ली मधील श्रावणी अभंग व इ.३ री मधील समृध्दी राखुंडे यांनी जिल्ह्यात तिसरा क्रमांक येण्याचा बहुमान मिळवला आहे.

गुणवत्ता यादीतील इतर मुली पुढीलप्रमाणे.. **इ.१ ली :** शरयु फडतरे (केंद्रात पहिली), निर्जला ओहोळ (केंद्रात तिसरी), आदिशा दोशी (केंद्रात चौथी), वीरा ओहोळ (केंद्रात पाचवी), देवांशी शिंदे – केंद्रात आठवी **इ.२ री :** आरोही घुमरे (केंद्रात दुसरी), समृध्दी साडेकर (केंद्रात तिसरी), पूर्वा घोलप (केंद्रात चौथी), राजवैभवी देवकर (केंद्रात चौथी), भैरवी लटके (केंद्रात सहावी). **इ.३ री :** समीक्षा थोरे (केंद्रात पहिली), सांची कांबळे (केंद्रात दुसरी), भक्ती हवालदार (केंद्रात तिसरी), श्रध्दा गरड (केंद्रात तिसरी), कृषिका माने (केंद्रात सातवी), संस्कृती दळवी (केंद्रात नववी), अनुजा भोसले (केंद्रात दहावी), स्वराली घनकुटे (केंद्रात अकरावी). **इ.४ थी :** श्रेया करळे (केंद्रात दुसरी), संस्कृती वीर (केंद्रात पाचवी), स्वरा उकिरडे (केंद्रात सहावी). या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका तृप्ती बेडकुते, चंद्रकला टांगडे, संध्या शिंदे, रमेश नामदे, निलेश धर्माधिकारी, सुनिता क्षीरसागर, मोनिका चौधरी, भालचंद्र निमगिरे, भाग्यश्री पिसे, सुवर्णा वेळापुरे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन मुख्याधिकारी बालाजी लोंढे, प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, मुख्याध्यापक तथा केंद्र समन्वयक दयानंद चौधरी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमृतसिंग परदेशी, उपाध्यक्षा भाग्यश्री फंड यांनी केले.


## गाळा भाड्याने देणे आहे

कृष्णाजीनगर, कमलादेवी रोडटच १२०० चौ.फुट बांधकाम असलेला (गाळा) दुकान जागा संस्थासाठी भाड्याने देणे आहे

संपर्क

मो.९४२१०२३८१५, ८४२१७१६६३०


### करमाळ्यातील रस्त्यासंदर्भात झालेल्या बैठकीत गोंधळ

# ठाम निर्णय होत नसल्याने आ.शिंदे यांनी सोडली बैठक



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील खंडोबा मंदिर ते देवीचामाळ पायथा रस्त्याच्या संदर्भात तहसील कार्यालयात बैठक आयोजित केली होती. यामध्ये येणाऱ्या काळात होणारे गंभीर अपघात टाळण्यासाठी व निष्पाप लोकांचे प्राण वाचवण्यासाठी खंडोबा मंदिर ते श्रीदेवीचामाळ पायथा रस्त्याच्या दोन्ही बाजूने पंधरा फुटाचा सर्व्हिस रोड करणे, देवीच्या मंदिराकडे जाणारा रस्त्याचा कॉर्नर मोठा करणे, रस्त्याच्या मधोमध येणारे गेवराईचे छोटे मंदिर बाजूला घेणे या विषयावर चर्चा करण्यात आली. परंतू मुख्य विषय बाजूला ठेवून एकच गोंधळ उडाल्याने आमदार संजयमामा शिंदे हे बैठक सोडून निघून गेले.

या बैठकीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, वीज महामंडळ व त्याचे ठेकेदार प्रतिनिधी, श्री कमलाभवानी देवीचे ट्रस्ट सदस्य तसेच श्रीदेवीचामाळ ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. यावेळी छोटे मंदिर बाजूला घेण्यावरून काही जणांनी विनाकारण मोठा गोंधळ केला व जाणीवपूर्वक अनेक लोकांना आपले मत मांडू दिले नाही. त्यामुळे ही बैठक गोंधळात होऊन कोणताही ठाम निर्णय होऊ शकला नाही. गोंधळाची परिस्थिती पाहता आमदार संजयमामा शिंदे हे बैठक मध्येच सोडून निघून गेले. याप्रसंगी अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीदेवीचामाळ पायथा चौक व खंडोबा मंदिर चौक हा मृत्युचा सापळा होणार असून या रस्त्याच्या दोन्ही बाजूने सर्व्हिस रोड असावा अशी ग्रामपंचायतीची मागणी आहे. शिवाय खंडोबा मंदिराकडून देवीच्या माळावर जाणारा कॉर्नर मोठा करावा, चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभा करावा, असे लेखी पत्र आम्ही बांधकाम खात्याला दिले आहे. या पत्रावर सर्व ग्रामपंचायत सदस्यांच्या सह्या आहेत. या ठिकाणी भावी काळात होणारे मोठे अपघात लक्षात घेता योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा; असे मत श्रीदेवीचामाळ ग्रामपंचायतीचे सरपंच महेश सोरटे यांनी बैठकीत व्यक्त केले.

हा प्रश्न भावनिक न करता येणाऱ्या काळात होणारे अपघात टाळण्यासाठी पायथ्याशी असलेले छोटे मंदिर बाजूला घ्यावे व दोन्ही बाजूंनी १५ फुटाचा सर्व्हिस रस्ता करावा. या दोन्ही बाजूची जागा कमलादेवी ट्रस्टच्या मालकीची आहे. हा रस्ता करण्यास आम्ही मान्यता दिली आहे; असे मत कमलाभवानी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ चिवटे यांनी बैठकीत व्यक्त केले.

काही लोक स्वत:च्या स्वार्थासाठी व वैयक्ती वादातून या लोकहिताच्या कामाला विरोध करत आहेत. या रस्त्याच्या दुतर्फा बाजूने १५ मीटरचा सर्व्हीस रस्ता करावा, पायथ्याशी असलेले चार बाय चार चे मंदिर एका बाजूला घ्यावे. शिवाय खंडोबामाळ येथे निर्माण होणाऱ्या चौकात व ही सर्व कामे ठेकेदारांनी करून घ्यावी. याबाबत आ.शिंदे यांनी पुढाकार घ्यावा. स्वार्थासाठी चांगले कामाला विरोध करणाऱ्यांना खड्यासारखे बाजूला करणे गरजेचे आहे; असे मत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी बैठकीत व्यक्त केले.


## प्लॉट विकणे आहे

कजारिया शोरुम शेजारील नवीन बायपास रोड पासून जवळ असलेला एन.ए. प्लॉट (१८३६ स्क्वे.फुट) विकणे आहे.

संपर्क : मो.९४२३२३७६८५

# विचाराची बैठक आणि घरात एक मत असलं की 'आदर्श परिवार' बनतो

ग्रामीण भागात शेती करण तसं जिकीरीच काम असतं, मुळातच कर्ज काढून शेती पिकवण आणि परिवार उभा करणं तसं सोप नसतं पण विचाराची बैठक आणि घरात एक मत असलं की सर्व सहज शक्य होतं. हे हिवरे येथील बाळासाहेब पुजारी यांच्या आदर्श परिवारातून स्पष्ट झाले आहे.

बाळासाहेब पुजारी यांचे वडील रघुनाथ पुजारी व आई पद्मीनबाई पुजारी. आई-वडीलांना बाळासाहेब हे एकुलता एक चिरंजीव . त्यांना दोन बहिणी आहेत.सौ. कालींदी त्रिंबक खांबकर (रा. भूम) व शशीकला अविनाश गुरव (वैराग) दोघी आपल्या घरी सुखात आहेत. बाळासाहेब पुजारी यांचे वडीलांना देवस्थानची निम्मी पुजारी होती तर अन्य जणात निम्मी होती. वडीलांना हे सर्व जमत नव्हते, त्यामुळे त्यांनी बाळासाहेबांना सहावीतूनच शाळेतून घरी ठेवले. देवस्थाची पुजारी, शेती करावी लागली. जमीन भरपूर होती,पुर्वी जमीनीचे महत्व नव्हते, त्यामुळे बाळासाहेबांच्या वडीलांनी अनेकांना जमीनी विक्री केल्या साठेखत लिहून दिले कारण त्यांची जमीन वर्ग-२ ची होती, त्यामुळे खरेदीखते झाली नव्हती. बाळासाहेबांचा पहिला लढा सुरू झाला तो साठेखत करून घेणाऱ्या विरू ध्द. त्यांनी ज्या ज्या व्यक्तींनी साठे खत केले त्यांना त्याचे पैसे परत केले व जमीन सोडवली. त्यावेळी शेतीतून जास्त उत्पन्न नव्हते पण देवस्थानच्या पुजारीपणातून मिळणारे उत्पन्न, मिळेल ते काम व निर्व्यसनीपणा यामुळे त्यांना ते शक्य झाले. सन १९९६ साली मोहोळ तालुक्यातील सैंदणे येथील अशोक मोकाशी यांच्या कन्या जयश्री यांच्या बरोबर त्यांचा विवाह झाला. लग्न झाल्यापासूनच सौ जयश्री यांचे पाठबळ बाळासाहेब यांना मिळाले. त्यामुळे त्यांना प्रगती करणे शक्य झाले. त्यांना तीन मुले. मोठी मुलगी पल्लवी हिला बी.कॉम पर्यंत शिकवले आहे. तीचा विवाह वैराग येथील अमीत गुरव यांच्या बरोबर झाला असून त्यांचेही शिक्षण बी.ए. बी.एड. झाले आहे;पण ते फुलांचा व डेकोरेशनचा व्यवसाय करत आहेत. दुसरा मुलगा प्रदीप एम.एस्सी. (केमेस्ट्री) झाला आहे. तो हुशार असून त्याला सिप्ला कंपनीत जॉब लागला होता पण शेतीची आवड असल्याने त्याने तो जॉब सोडला. छोटा प्रफुल्ल नुकताच बीएस्सी अॅग्री (फळबाग) झाला आहे.

एका बाजूला जमीन सोडवणे, दुसऱ्या बाजूला मुलांची शिक्षणे, मुलींचे लग्न व परिवाराची प्रगती अशा जबाबदाऱ्या बाळासाहेब व सौ. जयश्री मोठ्या जोमाणे पार पाडत होते. दरम्यान पुजारकीचा वाद गावातील काही लोकांनी लावला व त्यामुळे बाळासाहेबांना नवीन व्याप लागला. पण त्यांनी कोठेच हार मानली नाही. लढाई चालू ठेवली व त्यात त्यांना यश मिळत गेले. शेतीसाठी बँकेकडून कर्ज घेऊन सीना नदीवरून जवळपास साडे सहा किलोमीटर लांबीची पाच इंची पाईप केली. १७ एकर शेतीत त्यांनी सुधारणा सुरू केली. शेती सुधारणेसाठी कुबोटा ट्रॅक्टर घेतला, शेतात शेततळे केले व सुधारीत पीके घेणे सुरू केले.

## हिवरे येथील पुजारी यांचा आदर्श परिवार



माझा मोठा मुलगा प्रदीप (भैय्या) याला शेतीची प्रचंड आवड आहे. उच्च शिक्षण घेऊन त्याला लागलेली नोकरी त्यांने सोडली. तो शिक्षण घेत असतानाच शेतीत आम्ही टोमॅटो,केळी,मका, खरबूज, आद्रक,ऊस,कोबी, फ्लॉवर अशी पीके घेतली . अपवाद वगळता, या पीकात चांगले यश मिळाले. अलीकडे ऊसाची रोपे तयार केली, अन्य रोपांची नर्सरी सुरू केली पण तीचे स्वरूप लवकरच मोठे करणार आहे. लवकरच ब्रोकोली (इंग्रजी भाजी) व झुकोनी (इंग्रजी काकडी) याची लागवड करणार आहे. शिवाय डाळींब व लिंबोणी चीही लागवड करणार आहोत. शेतात भैय्या हा अनेक शेतकऱ्यांना सुधारीत शेतीसाठी मोफत मार्गदर्शन करतो. त्यांनी कृषी सेवा केंद्र सुरू केले आहे. त्याबरोबरच मोफत शेतकरी मार्गदर्शन केंद्र चालवतो. छोटा मुलगा प्रफुल्ल हा ही हुशार असून त्यालाही शेतीची आवड आहे. परंतू नोकरी करायची की शेती याचा निर्णय तोच घेणार आहे. पण दोन्ही मुले उच्च शिक्षीत असूनही शेतातील सर्व कामे करतात, ही बाब महत्वाची आहे. आमच्या परिवारात कोणतेही व्यसन नाही. विनाकारण गप्पा मारण्याचे सुध्दा व्यसन नाही. त्यामुळे आमचा परिवार प्रगती करू शकला.

**बाळासाहेब पुजारी**
**(आदर्श शेतकरी व पुजारी नागनाथ देवस्थान) ९८८१०२८१९६**

हार्दिक अभिनंदन

चेअरमन



श्री.नटराज सयाजी भोगे

माजी आमदार



अर्जुननगर विविध कार्यकारी सेवा सह.संस्थेच्या नूतन चेअरमन पदी

**श्री.नटराज सयाजी भोगे**

यांची निवड झाल्याबद्दल

**हार्दिक अभिनंदन !**

शुभेच्छुक

**समस्त भोगे परिवार, अर्जुननगर**

### राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत
## गुरूकुल पब्लिक स्कुलचे १५ विद्यार्थी राज्य व जिल्हा यादीत



करमाळा (सं.प्र.) : राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत करमाळा येथील गुरूकुल पब्लिक स्कुलने सुयश संपादन केले असून या परीक्षेत स्कुलचे १५ विद्यार्थी राज्य व जिल्हा यादीत आले आहेत. यामध्ये इयत्ता दुसरीतील युध्दवीर नलवडे हा राज्यात सहावा, इयत्ता तिसरी मधील समर्थ शेळके राज्यात सहावा, आदित्य भांगे राज्यात सातवा आला आहे.

मंथन परीक्षेतील इतर यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे.. सर्वेश नेटके (इ.१ली) - केंद्रात दुसरा, जिल्ह्यात आठवा व राज्यात अकरावा., पार्थ गेंड - केंद्रात दुसरा, जिल्ह्यात आठवा व राज्यात अकरावा., अर्जुन फरतडे - केंद्रात तिसरा, जिल्ह्यात नववा, राज्यात बारावा., तेजस्विनी शिंदे (इ.२री) - केंद्रात पहिली, जिल्ह्यात आठवी व राज्यात दहावी., आर्य गपाट - केंद्रात तिसरा, जिल्ह्यात दहावा, राज्यात बारावा., अथर्व मोरे - केंद्रात तिसरा, जिल्ह्यात दहावा व राज्यात बारावा., शौर्य शिंदे (इ.३री) - केंद्रात पहिला, जिल्ह्यात बारावा, राज्यात पंधरावा., आदिती चेंडगे - केंद्रात दुसरी, जिल्ह्यात तेरावी, राज्यात सोळावी., स्पंदन सावंत - केंद्रात पाचवी, जिल्ह्यात अठरावी व राज्यात एकविसावी., सानवी नेटके (इ.४ थी) - केंद्रात दुसरी, जिल्ह्यात सोळावी व राज्यात विसावी., संचिता माने (इ.५ वी) - केंद्रात पहिली, जिल्ह्यात तेरावी व राज्यात पंधरावी., अथर्व चव्हाण (इ.६ वी) - केंद्रात दुसरा, जिल्ह्यात सोळावा, राज्यात चोवीसावा. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष नितीन भोगे यांनी केले.

## बायकोवर बलात्कार करतो काय म्हणून चाकूने सपासपा वार

करमाळा(सं.प्र.) : माझ्या बायकोवर बलात्कार करतो काय..? तु तिच्याकडे वाकड्या नजरेने बघतो काय..? असे म्हणत गौंडरे येथे एकावर चाकूचे सपासप वार केले. हा प्रकार ३ मे ला दुपारी १.२५ वाजता घडला आहे. यात हकीकत अशी की, समाधान रोहिदास निळ (रा.निमगाव) याने फिर्याद दिली आहे. त्यात त्याने म्हटले,की माझे गावातील एका व्यक्तीच्या पत्नीने माझ्या विरूध्द गेल्या दोन वर्षापुर्वी बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर ३ एप्रिल २०२३ रोजी १.२५ वाजता आवटीवरून गौंडरे मार्गे येत असताना रस्त्यात मी एकटा आहे, हे पाहून सदरची व्यक्ती आली व त्याने तू माझ्या बायकोकडे वाईट नजरेने बघतो काय..? तिच्यावर बलात्कार करतो काय..? असे म्हणून माझ्यावर चाकूने सपासपा वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस उप निरीक्षक प्रविण साने यांनी यातील संशयीत आरोपीला अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## उघड्या घरात शिरून ४८ हजार रूपयाची चोरी

करमाळा(सं.प्र.) : घराचा दरवाजा उघडा पाहून चोरांनी घरात शिरून कपाटातील सोन्याचे मंगळसुत्र व मोबाईल असा ४८ हजार रूपयाचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला आहे. हा प्रकार विहाळ येथे १ मे च्या मध्यरात्री घडला आहे. या प्रकरणी आजीनाथ मच्छिंद्र नाळे (रा. विहाळ) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की १ मे च्या रात्री आम्ही जेवण करून झोपलो असता, मध्यरात्री घरात आवाज आल्याने मी जागा झालो, त्यावेळी घरातून एक माणूस पळून जाताना पाहिला, त्याचा पाठलाग केला असता, तिघेजण होते. त्यांनी माझा मोबाईल व आईचे सोन्याचे मंगळसुत्र असा ४८ हजार रूपयाचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उप निरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

## घोलपनगर येथे लावलेली मोटारसायकलची चोरी

करमाळा(सं.प्र.) : घोलपनगर, करमाळा येथे लावलेली मोटारसायकल चोरट्यांनी चोरून नेली आहे. हा प्रकार २९ एप्रिल ला दुपारी १ ते ४ यावेळेत घडला आहे, यात शरद भरत जाधव (रा.घोलपनगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की २९ एप्रिल रोजी मी माझे सरकारी सेवा केंद्राचे कामकाज करताना माझी बजाज डिस्कव्हर कंपनीची मोटारसायकल घोलपनगर येथील वरद हॉस्पीटल समोर दुपारी १ वाजता लावली व माझे कामकाज संपल्यावर सायंकाळी चार वाजता माझी मोटारसायकल पाहिली असता, दिसून आली नाही. सर्वत्र शोध घेतला परंतू ती सापडली नाही. ती चोरट्याने चोरून नेली आहे. याप्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## मोटारसायकलची मालट्रकला धडक- मोटार सायकलस्वार गंभीर जखमी

करमाळा (सं.प्र.) : जातेगाव येथे नगरकडे जाणाऱ्या मालट्रकला मोटारसायकलस्वाराने रॉंगसाईडने पाठीमागून येवून धडक दिली. त्यात मोटारसायकल स्वार जखमी तर झालाच पण मोटारसायकल व मालट्रकचेपण नुकसान झाले आहे. हा अपघात २ मे रोजी दुपारी १२-३० वाजता झाला आहे. यात मालट्रक चालक विनोद के कृष्णमुर्ती (रा. नंडदय,तामीळनाडू ) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की २ मे २०२३ रोजी मी नगरकडे माझी मालट्रक क्रमांक टी.एन. ४७ ए.एफ. ९४५१ घेऊन जात होतो. माझ्या ट्रक मध्ये कच्चे आंबे होते. त्यामुळे मी ट्रक सावकाश चालवत होतो. त्यावेळी अनोळखी मोटारसायकल स्वार रॉंगसाईडने माठीमागून येवून माझे मालट्रकला धडकला. त्यात तो गंभीर जखमी झाला, तसेच मोटारसायकल व माझे ट्रकचेपण नुकसान झाले. घटना घडल्यानंतर लोक आल्याने मी पळून जावून लपून बसलो. रात्रभर बाहेर थांबलो नंतर दुसऱ्या दिवशी करमाळा पोलीसात येवून फिर्याद दिली आहे. या प्रकरणी पोलीसांनी मोटारसायकल चालकाविरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

## वंजारवाडी येथे पाहुण्याच्या मोटारसायकलची चोरी

करमाळा(सं.प्र.) : वंजारवाडी येथे आलेल्या पाहुण्याची मोटारसायकल चोरट्यांनी चोरून नेली आहे. हा प्रकार २७ एप्रिल रोजी घडला आहे, याची फिर्याद ३ मे २०२३ रोजी नोंदली आहे. यात भाऊसाहेब धनाजी कोकरे (वय-२३,रा.उमरड) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले,की मी माझ्या मावशीकडे वंजारवाडी येथे २७ एप्रिल रोजी जर्शी गाय पाहण्यासाठी गेलो होतो. उशीर झाल्याने मी मावशीकडेच थांबलो होतो. त्यावेळी मावशीच्या घरासमोर माझी हिरो-होंडा स्पेलंडर क्रमांक एम.एच.४५ए एस २३७७ ही लावली होती. सकाळी ६-३० उठून माझी मोटारसायकल पाहिली असता, दिसून आली नाही. सर्वत्र शोध घेतला परंतू ती सापडली नाही. ती चोरट्याने चोरून नेली आहे. याप्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उप निरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

## छत्रपती श्री संभाजी महाराज यांचे जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर

करमाळा(सं.प्र.) : छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या ३६६ व्या जयंतीनिमित्त १४ मे रोजी सकाळी साडेनऊ ते सायंकाळी साडेचार या वेळेत भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर छत्रपती चौक, भवानीपेठ, करमाळा येथे होणार आहे. तरी जास्तीत जास्त नागरीकांनी रक्तदान शिबीरात सहभागी व्हावे; असे आवाहन करण्यात आले आहे.



# मनिषा बाभळे यांना महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान

करमाळा(सं.प्र.) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पोंधवडी येथील पदवीधर शिक्षिका मनिषा हरिश्चंद्र पेटकर -बाभळे यांना महाराष्ट्र शासनाचा जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर यांचे हस्ते व बालविकास प्रकल्प अधिकारी डॉ.विजय खोमणे यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र दिनी पोलीस मुख्यालय सोलापूर येथे प्रदान करण्यात आला. दहा हजार रूपयाचा धनादेश, सन्मानपत्र व आकर्षक ट्रॉफी असे पुरस्काराचे स्वरूप होते. हा पुरस्कार महिला व बालविकस क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांना प्रोत्साहन मिळावे या उदात्त हेतूने मंत्रालयाच्या वतीने देण्यात येतो. गेल्या ३० वर्षापासून मनिषा पेटकर यांनी महिला व मुलींच्या शैक्षणिक सामाजिक व आर्थिक विकासासाठी विविध उपक्रम राबवून महिला व मुलींचे सक्षमीकरण केले आहे. महिला मेळावे घेऊन महिला व मुलींसाठी असणारे कायदे त्यांचे फायदे यांची माहिती देणे तसेच किशोरी मेळावे घेऊन किशोर अवस्थेतील समस्या व उपाय., मासिक पाळी विषयाच्या अंधश्रध्दा दूर करणे तसेच मनोरंजनातून महिलांना लघु उद्योगाचे प्रशिक्षण देणे, विधवा व सर्व महिलांचे हळदी कुंकू कार्यक्रमातून उद्बोधन करणे, बेटी



बचाओ बेटी पढाओ नाट्यीकरणातून प्रबोधन करणे, स्त्रीभृणहत्यांना मार्गदर्शन करून प्रतिबंध करणे, मुलींना बालविवाहाचे दुष्परिणाम समजावून सांगणे तसेच महिला दिनी सर्व महिलांना टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करण्याचे मोफत प्रशिक्षण देणे, मुलींना गृहकौशल्य- जीवन कौशल्य व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे. अशा विविध सामाजिक कार्यामुळे मनिषा पेटकर यांची पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, केंद्रप्रमुख चंद्रहास चोरमले, मुख्याध्यापक साबळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील जाधव, पोंधवडी ग्रामस्थ यांनी मनीषा पेटकर यांचे विशेष अभिनंदन केले.

# भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्य पदी दिपक चव्हाण यांची निवड



करमाळा(सं.प्र.) : भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारिणीच्या प्रदेश निमंत्रित सदस्य पदी करमाळा येथील भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सचिव दिपक चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

दिपक चव्हाण यांनी सोलापूर विद्यापीठ सिनेट सदस्य, दक्षिण पश्चिम रेल्वे समिती सदस्य, भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस, अध्यक्ष सर्वोदय प्रतिष्ठान या पदांची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळलेली आहे. भाजपाच्या माध्यमातून वेळोवेळी सामाजिक उपक्रम राबवणे तसेच विकासकामांना प्राधान्य देऊन शासन दरबारी त्याचा पाठपुरावा करून अनेक विषय मार्गी लावलेले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल माजी मंत्री आमदार सुभाष देशमुख, खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी, तालुका अध्यक्ष गणेश चिवटे आदींनी दिपक चव्हाण यांचे अभिनंदन केले. पुढील काळात राजकारणामध्ये सक्रिय राहून विकासकामांना प्राधान्य देत पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे मत दिपक चव्हाण यांनी व्यक्त केले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत चिखलठाण येथील इरा पब्लिक स्कुलचे यश

करमाळा (सं.प्र.) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत आयोजित करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत चिखलठाण येथील इरा पब्लिक स्कुच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेसाठी प्रशालेतील नऊ विद्यार्थी बसले होते. त्यातील सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. इयत्ता पाचवी मध्ये झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत इरा पब्लिक स्कुल मधील सुहास भारत मुळीक, कन्हैय्या जोतिराम जाधव, यश ज्ञानदेव सरडे, समृध्दी दिगंबर शंकर, अमृता तुकाराम चोरगे, अक्षरा दादा पोरे या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे संस्थापक डॉ.ब्रिजेश बारकुंड, मुख्याध्यापक कसबे, वर्गशिक्षिका कोठारी मॅडम यांनी केले.

**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रूपये भरून वर्षेभर घरपोच अंक मिळवा.**

हार्दिक अभिनंदन

मंथन स्पर्धा परीक्षेत

**गुरूकुल पब्लिक स्कुलचे घवघवीत यश !**

हार्दिक अभिनंदन



**युध्दवीर नलवडे** (इ.२ री)
राज्यात-६ वा



**समर्थ शेळके** (इ.३ री)
राज्यात-६ वा



**आदित्य भांगे** (इ.३ री)
राज्यात-७ वा



**सर्वेश नेटके** (इ.१ ली)
राज्यात-११ वा, केंद्रात-२ रा
जिल्ह्यात -८ वा



**पार्थ गेंड** (इ.१ ली)
राज्यात-११ वा, केंद्रात-२ रा
जिल्ह्यात -८ वा



**अर्जुन फरतडे**(इ.१ ली)
राज्यात-१२ वा, केंद्रात-३ रा
जिल्ह्यात -९ वा



**तेजस्विनी शिंदे** (इ.२ री)
राज्यात-१० वा, केंद्रात-१ ली
जिल्ह्यात -८ वा



**आर्यन गपाट** (इ.२ री)
राज्यात-१२ वा, केंद्रात-३ रा
जिल्ह्यात-१० वा



**अथर्व मोरे** (इ.२ री)
राज्यात-१२ वा, केंद्रात-३ रा
जिल्ह्यात -१० वा



**शौर्य शिंदे** (इ.३ री)
राज्यात-१५ वा, केंद्रात-१ ला
जिल्ह्यात-१२ वा



**आदिती चेंडगे** (इ.३ री)
राज्यात-१६ वी, केंद्रात-२ रा
जिल्ह्यात-१३ वी



**स्पंदन सावंत** (इ.३ री)
राज्यात-२१ वा, केंद्रात-५ वा
जिल्ह्यात-१८ वा



**सानवी नेटके** (इ.४ थी)
राज्यात-२० वा, केंद्रात-२ रा
जिल्ह्यात -१६ वा



**संचिता माने** (इ.५ वी)
राज्यात-१५ वा, केंद्रात-१ ला
जिल्ह्यात -१३ वा



**अथर्व चव्हाण** (इ.६ वी)
राज्यात-२४ वा, केंद्रात-२ रा
जिल्ह्यात -१६ वा

**सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन !**

शुभेच्छुक:- **गुरूकुल पब्लिक स्कुल, करमाळा** जि.सोलापूर


व्हा.चेअरमन
आधारस्तंभ
श्री विलासराव घुमरे ना.सह. पतसंस्थेचे व्हा.चेअरमन
मा.श्री.ॲड.विक्रांत(दादा) घुमरे यांना दि.६ मे रोजी असलेल्या
वाढदिवसास हार्दिक शुभेच्छा ! तसेच विद्या विकास मंडळाचे सचिव,
आमचे आधारस्तंभ व मार्गदर्शक मा.श्री.विलासरावजी घुमरे (सर) यांना
मंगळवेढा येथील दामाजी एक्सप्रेस या दैनिका तर्फे शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट
कामगिरीबद्दल 'शिक्षणरत्न' पुरस्कार मिळाल्याबद्दल
चेअरमन
सचिव
हार्दिक
अभिनंदन !
श्री.चंद्रशेखर शिलवंत (सर)
श्री.राजेंद्र साळुंखे (सर)
शुभेच्छुक
विलासरावजी घुमरे ना. सह.पतसंस्था मर्या; करमाळा
सर्व संचालक, सभासद, कर्मचारी व सर्व पिग्मी एजंट